www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : १४५ वा  रविवार दि. ०९ फेब्रुवारी २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

दैं.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## गुड मॉर्निंग इंडीया

सुनिल शां. पेंडुरकर




# दिल्लीत आपचा ‘दारु’ण पराभव

दैनिक युवक आधार

-------------

**नवी दिल्ली** : मफलरमॅन अरविंद केजरीवाल यांनी आकर्षक घोषणांचा पाऊस पाडल्यानंतरही आम आदमी पक्षाचा दिल्लीतील किल्ला खेळाच्या पत्त्याप्रमाणे भुईसपाट झाला आहे. मात्र, केजरीवाल यांच्या कोणत्या चुकांमुळे भाजपच्या हाती सत्तेची दोरी दिली, यावर चर्चा सुरू झाली आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाला दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी आपने पूर्ण जोर लावला होता. परंतु, भाजपच्या मायक्रो-मॅनेजमेंटपुढे आपचे फासे उलटे पडले.

● **यमुनेचे प्रदूषण** -यमुना स्वच्छ करू असा दावा केजरीवाल यांनी केला होता. मात्र, यमुना स्वच्छ होण्याऐवजी दिवसेंदिवस प्रदूषित होत गेली. दिल्लीकरांना नळातून दूषित पाणी मिळू लागले होते. १० वर्षे दिल्लीच्या सत्तेत राहूनही आप सरकारला यमुना स्वच्छ करता आली नाही. अशातच, हरयाणावर पाण्यात विष मिसळविल्याचा आरोप केल्यानंतर मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांनी यमुनेचे पाणी पिऊन दाखविले. याचा फटका आपला बसला.

● **अर्थसंकल्पाचा मोठा वाटा** -अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मतदानाच्या चार दिवसाआधी सादर केलेल्या बजेटमध्ये १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा करून मध्यमवर्गाला मोठा दिलासा दिला होता. प्रवेश वर्मा यांनी ज्या नवी दिल्ली मतदारसंघातून केजरीवाल यांचा पराभव केला त्या मतदारसंघात केंद्र सरकारचे कर्मचारी मोठ्या प्रमाणावर राहतात. यामुळे आपच्या पराभवात बजेटने सिंहाचा वाटा उचलला.

### कॉंग्रेस भुईसपाट ; भाजपच्या हाती सत्ता



### भाजप ४८ / आप २२ / कॉंग्रेस ००

● **आपचे १६ सदस्य तुरुंगात** -आपच्या पराभवाच्या कारणांत मंत्रिमंडळातील सदस्यांचे तुरुंगात जाणे हे पहिल्या क्रमांकावर ठेवावे लागेल. अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, डॉ. सत्येंद्र जैन, सोमनाथ भारती व राज्यसभेचे खासदार संजय सिंग यांच्यासह तब्बल १६ जणांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगाची हवा खावी लागली. भ्रष्टाचाररहित प्रामाणिक राजकारण करण्यासाठी अरविंद केजरीवाल हे राजकारणात आले होते.

● **‘एकला चलो रे’चा फटका** -केजरीवाल यांनी कॉंग्रेसबरोबर आघाडी करण्यापेक्षा ‘एकला चलो’चा मार्ग स्वीकारला. यामुळे कॉंग्रेसने सर्व ७० मतदारसंघात उमेदवार उतरविले. या निवडणुकीत कॉंग्रेसचा एकही उमेदवार विजयी झाला नसला तरी आपच्या मतांचे विभाजन करण्यात त्यांना यश आले आहे. थोडक्यात, आघाडी न करता निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय आपला भोवला असे म्हणता येईल. केजरीवाल यांनी सत्ताविरोधी लाटेचा सामना करण्यासाठी २८ विद्यमान आमदारांचे तिकीट कापून नवीन चेहऱ्यांना मैदानात उतरविले. परंतु, याचा कोणताही फायदा पक्षाला झाला नाही. याउलट, ऐन निवडणुकीच्या तोंडावर आठ आमदार पक्ष सोडून भाजपात सामील झाले. केजरीवाल यांनी जाहीर केलेल्या योजनाही दिल्लीकरांच्या पसंतीस उतरल्या नाहीत.

## अजिंठा लेणीत मधमाशांच्या हल्ल्यात ८ जण जखमी

दैनिक युवक आधार

**प्रतिनिधीः-योगेश पालोदकर/सिल्लोडः-** मधमाशांनी अचानक हल्ला चढवल्याने जग प्रसिद्ध अजिंठा लेणी पाहणाऱ्या पर्यटकांची पळापळ सुरू झाली. मधमाश्यांच्या हल्ल्यात दोन चिनी पर्यटकांसह १५ ते २० पर्यटक जखमी झाले. सहा पर्यटकांवर अजिंठा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे. शुक्रवारी (७ फेब्रुवारी) दुपारी साडेचार च्या सुमारास ही घटना घडली. लेणी क्र.१० वरील आगे मोहळावरील मधमाशा अचानक आक्रमक झाल्या आणि त्यांनी पर्यटकांवर हल्ला चढवत चावा घेणे सुरू केले. पर्यटक सैरभैर होऊन पळत सुटले. हल्ल्यात १५ ते २० पर्यटक जखमी झाले. त्यांना सुरक्षा रक्षकांनी तातडीने रुग्णवाहिकेतून अजिंठा येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी आणले होते. मधमाशांच्या हल्ल्यामुळे नंतर पर्यटक लेणी क्र.२ पासून पुढे गेलेच नाही. या घटनेची माहिती मिळताच काही सुरक्षा रक्षक त्यांचा बचाव करण्यासाठी धावून येत त्यांनी शर्तीचे प्रयत्न केले. परंतु यात सुरक्षा रक्षक सचिन कोलते यांच्यासह प्रभाकर पाटणकर, सुशीला चव्हाण, रेखा चव्हाण, संजय जाधव हे पण जखमी झाले. बहुतांश पर्यटक मधमाशा शांत झाल्यावर तासाभराने लेणीतून बाहेर आले होते.

## न्यू इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज चांदोरी येथे ११ फेब्रुवारी पासून बारावीची बोर्ड परीक्षा

दैनिक युवक आधार

**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी/निफाड -** चांदोरी येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज चांदोरी, केंद्र क्रमांक 0276 वर म्हणजेच विद्यालयात फेब्रुवारी- मार्च 2025 ची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच बारावीची बोर्ड परीक्षा येत्या मंगळवार 11 फेब्रुवारी 2025 पासून सुरू होत आहे.सदर परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर चांदोरी, वऱ्हेदारणा, लाखलगाव या उपकेंद्रांवरील विद्यार्थी प्रविष्ट आहेत. जवळपास 278 विद्यार्थी चांदोरी परीक्षा केंद्रावर परीक्षा देणार आहेत. सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी कॉफी मुक्त अभियाना अंतर्गत कॉपीमुक्तीची शपथ देण्यात आलेली आहे. परीक्षा केंद्रावर प्रत्येक पेपरला बैठे तपासणी पथक तसेच दक्षता कमिटीचे सदस्य कार्यरत असतील.परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी पूर्णपणे खबरदारी घेण्यात आलेली आहे. प्रत्येक परीक्षा दालनात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांची शाळेच्या गेटवर तसेच परीक्षा दालना बाहेर अंगझडती होणार आहे. परीक्षा केंद्रावर एकूण बारा परीक्षा दालनात परीक्षा होईल. सर्व परीक्षा दालन शालेय इमारतीच्या वरच्या मजल्यावर पश्चिमेकडून पूर्वेकडे या दिशेने असणार आहेत. परीक्षा केंद्रावर सोमवारी 10 फेब्रुवारी रोजी इमारतीच्या दर्शनी भागात बैठक व्यवस्था प्रदर्शित करण्यात येईल. अशी माहिती 0276 चे परीक्षा केंद्र संचालक श्री अंबादास चौधरी यांनी दिली.आपल्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी. सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांना विद्यालयाकडून परीक्षेच्या हार्दिक शुभेच्छा प्राचार्य चौधरी यांनी दिल्या.

## पनवेल मधील आशा सेविकांचा सत्कार






दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल** :पनवेल मधील आशा सेविकांचा आरोग्य मंत्री यांच्या हस्ते कर्करोग करता उत्कृष्ट काम केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.4 फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिनानिमित्त उत्कृष्ट काम करणाऱ्या आरोग्य सेविका आणि आशा सेविका यांचा प्राथमिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. यावेळी आरोग्य सहाय्यक भक्ती पालकर, नमिता पाटील, आरोग्य सेविका योगिता गुरव, सारिका पाटील, निर्मला दाभणे, विनंती पाटील यांचा यशवंतराव चव्हाण सभागृह चर्चगेट, मुंबई येथे आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्काराबद्दल त्यांचे तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर अपर्णा पवार यांनी आणि पंचायत समितीने अभिनंदन केले आहे.

## धामणगाव खुर्द येथे जनावरांचे वंधत्व निवारण शिबीर संपन्न

दैनिक युवक आधार

**प्रतिनिधी डॉ वेदांत ओव्हाळ-**खेडच्या आदिवासी भागातील धामणगाव येथे खेड पंचायत समितीचे पशुधन विकास विस्तार अधिकारी डॉक्टर योगेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 7/2/2025 रोजी धामणगाव येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी शेतकऱ्यांनी आपली जनावरे आणून सहभाग नोंदवला जनावरांची तपासणी करून त्यांना गोचीड औषधे व मिनरल मिक्स्चर चे पुडे वाटप करण्यात आले डॉक्टर योगेश भीमराव रोकडे तसेच परिचर रमेश सोमा कशाळे यांनी शेतकऱ्यांना औषध कसे वापरायचे हे सांगितले याप्रसंगी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते धोंडू खामकर सरपंच मनोहर साबळे वामन कोकणे दत्तू मेचकर काशिनाथ साबळे पुनाजी मदगे दीपक हांडे शांताराम हांडे भागू मेमाणे किसन खामकर धोंडू खामकर अरुण मदगे सरपंच वनिता हांडे सखुबाई मदगे इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जय हनुमान म्हसोबा नारपोली, एक ७ मित्रांची द्वारा आयोजीत ४० गाव प्रीमियम लिग टुर्नामेंटमध्ये "ईट प्ले रीडचा सहभाग

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेलः** जय हनुमान म्हसोबा नारपोली आणि एक ७ मित्रांची द्वारा आयोजीत ४० गाव प्रीमियम लिग टुर्नामेंटमध्ये ईट प्ले रीडने सहभाग नोंदविला. क्रिकेट हा खेळ मोठ्या स्तरावर भारतामध्ये खेळला जातो. ४० गावामधील सर्व संघामध्ये ही क्रिकेट टुर्नामेंट नुकतीच पार पडली. हे औचित्य साधुन 'आकाश पाटील' यांनी ईट प्ले रीड" संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांना हजर राहण्यास व विशेष अतिथी म्हणून येण्यास निमंत्रण दिले, मात्र त्यांना यायला न जमल्यामुळे अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शना खाली कार्यरत असणाऱ्या रजदूतानी त्यांच्या वतीने हा सन्मान, सत्कार स्वीकारला. ईट प्ले रीड" च्या रजदूतांनी या गौरवपुर्ण टुर्नामेंट मध्ये सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व सामान्यापर्यंत आणि विशेष पद्धतीने खेळाडूंना आणि प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला.

==================



# ढोलकीच्या तालावर आणि हळदीकुंकू चा थाट खास 'ती' च्या अस्तित्वासाठी या उपक्रमाचे आयोजन

दैनिक युवक आधार

**पनवेल प्रतिनिधी-**शनिवार 6 फेब्रुवारी 2025 रोजी कामोठे येथील कराडी हॉल या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमीप्रमाणेच हळदी कुंकू ची सुरुवात विधवा महिला व एल. जि. बी. टी.यांना हळदी कुंकवाचा मान देऊन करण्यात आली .पूर्वापार चालत आलेल्या त्या रुढीला बाजूला सारून सर्वसामान्य स्त्री प्रमाणे तिलाही समाजात तोच मानसन्मान मिळावा हीच भावना ठेऊन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हळदी कुंकू चे आयोजन दिशा व्यासपीठामार्फत करण्यात आले होते शिवशाही सेना ( कामगार संघटना) संस्थापक मा. श्री. राजकुमार पाटील व सौ राजश्री पाटील यांच्या सहकार्याने तसेच साई द्वारका क्लीनिक व नर्सिंग होम चे डॉ हेमंत पाटील, यशोदा हॉस्पिटल चे डॉ स्नेहलता / डॉ बाळासाहेब खडबडे यांचे सहकार्य दिशा व्यासपीठास मिळाले. तसेच शुभांगी कलेक्शन च्या शुभांगी पाटील स्वीट एंजेल प्रि स्कूल च्या मंदाकिनी पाटील यांच्या कडून महिलांना वाण देण्यात आले तसेच हरेश्वर ज्वेलर्स कडून लकी ड्रॉ साठी सोन्याची नथ व 1 ग्रॅम गोल्ड नेकलेस देण्यात आला पैठणी साठी मनीषा घोटणे मॅडम चे सहकार्य मिळाले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती विमल बिडवे मॅडम (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कामोठे पोलिस स्टेशन)श्रीमती प्रियंका खरटमोल मॅडम(सहाय्यक पोलिस निरीक्षक) सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या मा. इंदू झा मॅडम.सौ. मोहिनी पाटील मॅडम (आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या सुविद्य पत्नी)सौ. स्नेहल पाटील (आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या भगिनी) उपस्थित होत्या.पतीच्या निधनानंतर महिलेला कुंकू लावण्यास बंदी घालणं कितपत योग्य आहे. दुखाःचा डोंगर डोक्यावर कोसळलेल्या असतानाही उद्योगधंदे, घरं चालवणे, मुलांचं शिक्षण या सर्व जबाबदाऱ्या महिला आपलं कर्तव्य समजून पार पाडतात. तरीही अशा महिलांना समाजात अशा समारंभात बाजूला सारलं जात म्हणूनच हा पायंडा आम्ही 2020 पासून मोडीत काढत आलेलो आहोत हा हळदी कुंकवाचा हा थाट खास त्यांच्यासाठीच असतो असे यावेळी दिशा संस्थापक सौ. निलम आंधळे म्हणाल्या.महिला सबलीकरण व सक्षमीकरणासाठीच्या कार्यात नेहमी दिशा सोबत आहे असे आश्वासन मा श्री राजकुमार पाटील यांनी दिले.कुंकवाचा धनी परलोकवासी झाल्यानंतर घरीदारी उपेक्षेची नजर वाट्याला आलेल्या महिलांच्या कपाळी हळदी-कुंकवाची बोटं लागली आणि त्यांच्या डोळ्यात पाणी तरळले एकमेकींना आलिंगन देऊन निःशब्द भावना नजरेतून यावेळी व्यक्त झाल्या यावेळी LGBT विकास व ज्ञानेश्वर यांचीही उपस्थिती कार्यक्रमात लाभली आपल्यातीलच एक असलेल्या या व्यक्तिमत्वास सर्वांनी स्वीकारावं त्यांच्याबद्दल असलेले गैरसमज दूर व्हावेत त्यांनाही तेवढाच मान सन्मान मिळावा या उद्देशाने ते ही या समारंभात व्यक्त झाले, या समारंभाचे भावनिक दृश्य यावेळी पाहायला मिळाला. यावेळी महिलांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.ढोलकीच्या तालावर महिलांनी काही परफॉर्मन्स देखील केले व इतर महिलांनाही थिरकायला भाग पाडले.नृत्यांगना मिताली पाटील खास या सदाबहार लावणी साठी उपस्थित होत्या. सायबर क्राईम व इतर विषयावरील जनजागृती च्या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते लाभलेल्या काही मान्यवरांचा सन्मानही यावेळी करण्यात आला. आरती चव्हाण मॅडम यांनी धमाल, मजेशीर, विविध खेळ खेळत बक्षीसांची लयलूट करत मोठ्या जल्लोषात समारंभ पार पडला. यावेळी दिशा व्यासपीठाच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळत सर्व महिलांच्या पाठीशी कणखरपणे उभे आहोत असे म्हणाल्या व आतापर्यंत च्या व्यासपीठातील काही आठवणी ताज्या करत त्या गहिवरून गेल्या. या हळदी कुंकू समारंभास कामोठे व परिसरातील महिला मान्यवरांची देखील उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. संस्कृती जपणारा, महिलांच्या सन्मानासाठी प्रेरणादायी ठरलेला हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



## पोलीस पाटीलांना करण्यात आले नवीन कायद्या विषयी मार्गदर्शन



दैनिक युवक आधार

**पनवेल, वार्ताहर** : पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटीलांची बैठक घेवून त्यांना नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांनी केले.यावेळी अधिकारी वर्गांनी उपस्थित पोलीस पाटीलांना आवश्यक त्या सुचना देताना सांगितले की, आगामी सण उत्सव कार्यक्रमांबाबत आगाऊ माहिती पोलीस ठाणे देणे, विनापरवाना राहणारे परदेशी नागरिकांची माहिती, भाडेकरूंची परिपूर्ण माहिती संकलित करणे., पोलिसांचे व्हाट्सअप चॅनेल, तसेच इतर हेल्पलाइन बाबत यापूर्वीच दिलेल्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करणे., महिला मुली ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षा बाबत माहिती दिली आहे. तसेच उपस्थितांना नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी हद्दीतील 42 पोलीस पाटील उपस्थित होते.

## क्रिकेट मॅच दरम्यान केली मारहाण,

### नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल**-भाताण येथे आमदार चषक क्रिकेटचे सामने चालू असताना गावातील जुन्या भांडणाचा राग मनात धरून नरेश गोमा म्हसकर (राहणार नारपोली, पनवेल) यांना मारहाण केल्याप्रकरणी नऊ जणांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.नरेश म्हस्कर हे नारपोली येथे राहत असून एक फेब्रुवारी रोजी भाताण येथे आमदार चषक रात्रपाळीचे क्रिकेटचे सामने चालू होते. त्यांच्या गावातील दोन क्रिकेटच्या टीम सेमी फायनलला गेल्याने ते मॅच पाहण्यासाठी मित्रांसोबत रात्री नऊ वाजता भाताणला गेले. दोन फेब्रुवारी रोजी रात्री सव्वा एकच्या सुमारास गावातील जुन्या वादाचा राग मला ठेवून एका इसमाने त्यांना धक्का दिला. यावेळी धक्का का दिला असे विचारले असता शिवीगाळ करून दंडावर बॅट मारली आणि काचेची बाटली मनगटावर मारली. त्यानंतर दुसऱ्या ईसमानी देखील मारहाण केली. त्यानंतर अक्षय गायकर याला देखील गावातील नागरिकांनी बॅटने मारहाण केली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नऊ जणां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

==========================

## अपघातात मोटर सायकल चालकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : एक्सेस मोटरसायकल भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या डिव्हायडरला धडकली आणि झालेल्या अपघातात तीस वर्षीय सुकृत दिलीप गोटसकर याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.2 फेब्रुवारी रोजी सुकृत गोटस्कर हा गणेश जयंती निमित्त गणपती दर्शनासाठी त्याच्या मामीच्या घरी डोंबिवली येथे गेला. आणि दर्शन करून तो मित्राला भेटण्यासाठी दादर येथे गेला. तीन फेब्रुवारी रोजी सकाळी साडे सातच्या सुमारास शेडुंग टोल नाक्याच्या पुढे खोपोली कडे जाणाऱ्या रस्त्यावर त्याच्या ताब्यातील सुझुकी कंपनीची एक्सेस मोटरसायकल क्रमांक एम एच 47 बी डब्ल्यू 6761 ही भरधाव वेगाने चालवली आणि एल अँड डब्लू कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या समोर आला असता डिव्हायडरला ठोकर लागली आणि तो दोन्ही हायवेच्या मध्ये जाऊन पडला. यावेळी तो त्यात जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला.

==========================

## दोघांना केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : घरी जाण्यासाठी रिक्षाची वाट पाहत असणाऱ्या दोघांना लाकडी फळीने मारहाण केल्याप्रकरणी तीन अनोळखी ईसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.मोहम्मद कलीम अब्दुल शरीफ अमीन कदरी हा शिळफाटा येथे राहत असून तो त्याच्या भावासह कोटिंग कंपनीत काम करतो. दोन फेब्रुवारी रोजी काम संपल्यानंतर संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास दोघेही घरी जाण्यासाठी रिक्षा स्टँडवर उभे होते. त्यानंतर ते एमआयडीसी पार्किंग ठिकाणी गेले आणि रिक्षासाठी उभे राहिले. यावेळी एक रिक्षावाला रॉंग साईडने येऊन पार्किंग कोठे आहे असे बोलून खाली उतरला आणि लाकडी फळीने भावाच्या डोक्यात मारले. त्यानंतर मोहम्मद कलीम याला देखील मारले. त्यानंतर एका रिक्षामध्ये दोन ते तीन लोक आले आणि त्यांनी देखील दोघांना मारहाण केली. यात ते जखमी झाले.

==========================

## सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : घरात प्रवेश करून वसीम मन्सूर पटेल याने तीन तोळे वजनाचा सोन्याच्या दागिना आणि वीस हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.झकरिया पटेल हे तळोजा येथे राहत असून चार फेब्रुवारी रोजी त्यांना रात्री साडेतीन च्या सुमारास जाग आली . यावेळी घराचा दरवाजा व बेडरूमची खिडकी उघडी दिसली. कपाटात सोन्याचा दागिने आणि रोख रक्कम दिसून आली नाही. त्यावेळी बेडरूमच्या खिडकीजवळ एक पाकीट घडलेले दिसले. त्यात गावातील वसीम पटेल या नावाचे पॅन कार्ड होते. तळोजा पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.




**दैनिक युवक आधार - दिव्यात आज मा. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व घनकचरा विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दिवा सर्कल, आगासन रोड, सिद्धिविनायक नगर इत्यादी ठिकाणी विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदर प्रसंगी प्रतिष्ठान चे अनुयायी व दिवा प्रभाग समितीचे मा. सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे, अधीक्षक सो. श्री. गिर, मा. परदेशीं , व स्वच्छता निरीक्षक दीपक गुजराथी, चंद्रकांत वायदंडे, संजय जाधव, रमेश चव्हाण व इतर कर्मचारी उपस्थित होते.**

**(फोटो - अमित जाधव )**

## शुभांगी राऊत यांची मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**-सेलू येथील गटकळ करिअर अकॅडमी ची विद्यार्थीनी शुभांगी राऊत यांची मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे गटकळ अकॅडमी येथे स्वागत करण्यात आले. यावेळी अकॅडमीचे संचालक रामेश्वर गटकळ सर,दीपक गटकळ सर, ताठे सर, राठोड सर, P. S.I गणेश पवार सर, माजी जिल्हा परिषद सदस्य हिंगोली गजानन शिरसागर,शुभांगी राऊत यांचे वडील विश्वनाथ राऊत, भाऊ लिंबाजी राऊत, मामा गजानन कंठाळे, शिवाजीराव खाडे, गोविंद जोशी,महेश राऊत व अकॅडमीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

====================

# डिस्टन्स इलेव्हनने पटकावले नमो चषक व्हॉलीबॉल विजेतेपद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** -भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ आयोजित करण्यात आला असून त्या अंतर्गत कामोठे येथे झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेचा विजेतेपद डिस्टन्स इलेव्हन या संघाने पटकावले. उपविजेते केवायसी इलेव्हन, तृतीय क्रमांक आयांश इलेव्हन तर चतुर्थ क्रमांक संघ इलेव्हन संघाने पटकाविला. विजेत्या संघाला १५ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला १० हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये व चषक तर चतुर्थ क्रमांकाच्या संघाला ०३ हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे पनवेल विधानसभा मतदार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत शनिवारी कामोठे मधील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर पुरुष




खुला गटाची व्हॉलीबॉल स्पर्धा पार पडली.या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर व नमो चषकचे मुख्य आयोजक परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्पर्धेचे उद्घाटन कामोठे भाजपचे अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी कामोठे पोस्ट ऑफिस अधिकारी बबन भोईर, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, विकास घरत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष व स्पर्धा समन्वयक मयुरेश



नेतकर, जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, अक्षय सिंग, जय पावणेकर,भीमराव पोवार, भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षा विद्या तामखेडे, साधना आचार्य, अनुसूचित मोर्चाचे कामोठे अध्यक्ष मयुर मोहिते,अनुसूचित महिला मोर्चा अध्यक्ष सोनाली खरटमोल, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, कळंबोली युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, देवांशू प्रबाळे,आयुष किंद्रे, यश भोईर, कामोठे युवा मोर्चाचे सरचिटणीस प्रवीण कोरडे, उपाध्यक्ष सागर ठाकरे, चिटणीस किरण जाधव, चिटणीस विकी टेकवडे, कोषाध्यक्ष अमोल बिनवडे, अमित गोडसे, सुयोग वाफारे, प्रथमेश सातपुते, निलेश सरगर, आकाश शिंदे, शंकर कारंडे, सुयश कांबळे, मयुर शिंदे, प्राणिल पवार, आकाश सिंग, आयुष कातोरे, नयन चौगुले, पार्थ लाले, रितेश कानोजिया,ओम पाटील, करन जगदाळे, प्रज्वल यांच्यासह इतर कार्यकर्ते व क्रीडा रसिक उपस्थित होते.

==================

## 51 ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद शाळांना विविध साहित्याचे वाटप



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : ओवळे ग्रामपंचायतचे सरपंच रुपेश गायकवाड व राकेश गायकवाड यांच्या पाठपुराव्याने उरणचे आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून उरण मतदार संघातील 51 ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद शाळांना विविध टेक्नॉलॉजी साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पुटर लॅब रूमचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले.पनवेल तालुक्यातील ओवळे येथे आमदार महेश बालदी यांनी ओवळे जिल्हा परिषद शाळेची इमारत लवकरात लवकर नवीन बांधण्याची तयारी करावी असे सांगितले. यावेळी मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. सरपंच रुपेश गायकवाड यांनी यावेळी उपस्थित असणारे प्रमुख पाहुणे व नेतेमंडळी, ग्रामस्थ, आमदार महेश बालदी, पनवेल पंचायत समितीचे गट विकास अधिकारी समीर वाठारकर, कॉंग्रेस नेते नंदराजशेठ मुंगाजी, यांचा सत्कार केला. यावेळी रुपेश धुमाळ, मदन आहिर, गजानन पाटील, सुनील पाटील, मनखूश नाईक, रोशन जितेकर, सदन डाऊर, मिथुन चितेकर, राजेंद्र सदावर्ते, प्रगती गायकवाड, सुवर्णा म्हात्रे, आनंदी पाटील, सुरक्षा गायकवाड, ओवळे ग्रामपंचायतचे ग्रामसेवक सचिन पाटील, प्रकाश वाजेकर, बळीराम गायकवाड, बबन म्हात्रे, विष्णू घोपकर उपसरपंच धीरज पाटील व अधिक मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## खारघर मध्ये ‘रस्ता सुरक्षा अभियान प्रबोधन कार्यशाळा’ संपन्न



**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : प्रादेशिक परिवहन कार्यालय,पनवेल आणि मोटार ड्रायव्हिंग स्कूल मालक संघटना, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत प्रबोधन कार्यशाळा नुकतीच खारघर मधील ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेत प्रादेशिक परिवहन कार्यालय मधील मोटार वाहन निरीक्षक योगेश शितोळे आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रिती पवार यांनी उपस्थित नागरिक आणि विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्व, वाहतुकीचे नियम आणि सुरक्षित ड्रायव्हिंग याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.कल्याणी म्हात्रे, उत्तर रायगड जिल्हा भाजपा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर शहर भाजपा उपाध्यक्ष किरण पाटील, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, ‘ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज’चे अध्यक्ष सुरज म्हात्रे, प्राचार्य दीपकोर सैनी, रेवी शेलदार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेत सुत्रसंचालन सपना पाटील यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी खारघर मधील मोटार ड्रायव्हिंग स्कूल संचालक दिपा भैरट, गणेश सांगळे, सागर भद्रा यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या कार्यशाळेत आरोग्य तपासणी शिबीर देखील आयोजित करण्यात आले होते.

# उत्पादन खर्च वाढतोय पण शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही!

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सूर्यकार**-सोयाबीनचे उत्पादन वाढत असले तरी दरात मात्र वाढ होताना दिसत नाही. दरवाढीची शेतकऱ्यांना आशा असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा माल घरात पडून आहे. यामुळे शेतकरीवर्गाची चिंता वाढली असून, दरवाढीची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे.दरवर्षी खरीप हंगामात इतर पिकांच्या तुलनेत सोयाबीनचा पेरा सर्वाधिक असतो. सोयाबीन हब म्हणून जिल्ह्याची ओळख आहे. मात्र मागील पाच वर्षांपासून सोयाबीनला चांगले दर मिळत नसल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. नांदेड जिल्ह्यातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर आहे. सिंचनाचा अभाव आहे. परंतु शेतकरी कष्टातून उत्पन्न घेतात. त्यातच अस्मानी सुल्तानी संकटाचा ससेमिरा शेतकऱ्यांच्या नशिबी पूजलेलाच असतो.एकीकडे उत्पादन खर्च वाढला असला तरी उत्पन्न मात्र कमीच आहे. सोयाबीन हे शेतकऱ्यांना हक्काचे पीक असले तरी मागील काही दिवसांपासून सोयाबीनचे दर मात्र कमालीचे खालावत चालले आहे.सोयाबीनचे दर वाढतील अशी शेतकऱ्यांना आशा असल्यामुळे सद्यस्थितीत अनेक शेतकऱ्यांकडे सोयाबीन पडून आहे. सन २०२२-२३ मध्ये नांदेड च्या बाजारात सोयाबीनला सरासरी ५५००पर्यंत दर होते, तर २०२३ मध्ये ५८००चा भाव होता. तर यावर्षी सरासरी ४ हजार पर्यंत दर मिळत आहेत.




**खते, बी बियाणे महागले**

**वाढत्या महामागाईने बळीराजा हवालदिल झाला आहे. शेती करणे कठीण होत चालले आहे. दरवर्षी खते, बी-बियाणे, औषधीचे दर वाढतच आहेत. मात्र त्या तुलनेत शेतमालाचे दर मात्र वाढत नसल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.**

यावर्षी सोयाबीनला सुरुवातीपासूनच चांगले दर मिळाले नसल्यामुळे भविष्यात भाव वाढतील या आशेवर असलेल्या अनेक शेतकऱ्यांनी आपला माल विक्रीस न आणता, घरात साठवून ठेवला आहे. अनेक शेतकऱ्यांना दरवाढीची प्रतीक्षा आहे.

================

## भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर कुं निकाळजे वरूड ( सर्कल )**-जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात माता रमाबाई भिमराव आंबेडकर यांच्या १२७ वी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली...!याप्रसंगी सरपंच पती रामचंद्र तेलंग्रे यांनी माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आपल्या भारतीय सविंधानाने अनेक अधिकार दिले. ते फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे मिळाले. एवढेच आपण लक्षात ठेवतो परंतु या मागे माता रमाईचा फार मोठा त्याग आहे त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. गरीबी सोबत दोन हात केले, कष्ट केले, कुटुंब सांभाळले आणि लग्नानंतर बाबासाहेबांना परदेशात लंडनला जाऊन शिक्षण करण्याची परवानगी दिली. त्यामुळेच बाबासाहेब बॅरिस्टर होऊ शकले. बाबासाहेब लंडनला असतांना बाबासाहेबांना पैशांची चणचण जाणवू लागल्याची माहिती माता रमाईंना मिळाली तेव्हा त्यांनी बाबासाहेबांना १४ रूपयांची मनिऑर्डर केली. त्या काळात पतीला परदेशात पैसे पाठविणारी




माता रमाई या कदाचित एकमेव पत्नी असतील. अनेक दुःख येऊन देखील माता रमाई रडत बसल्या नाही. माता रमाई या रडणाऱ्या नाही तर लढणाऱ्या होत्या. यावेळी उपस्थित शरद तेलंग्रे रहीम टेलर ( उपसरपंच ) मधुकर गायकवाड (रोजगार सेवक ) विलास गायकवाड ( तंटामुक्ती अध्यक्ष) शकुंतलाबाई गायकवाड ( ग्रामपंचायत सदस्य) सदाशिव खरात (ग्रामपंचायत सदस्य ) लिपिक समाधान डब्बे , गजानन दिलवाले , पंडित बोडखे प्रदीप नरवाडे ( शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते )अनिल नरवाडे विजय देशमुख ( माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे सदस्य) साहेबराव म्हस्के सदस्य धनराज तेलंग्रे पंडित दामधर आनंदा गायकवाड आण्णा वाघ आणि गांवकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवजयंती निमित्त मादणीत रंगणार संगीत शिवचरित्र कथा व सजिव देखाव्यांचा थरार...! नव तरुणांनी घडविला एक नवा आदर्श

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वार्ताहर**-अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शहरात,गावात,खेड्यात, पाड्यात दरवर्षी मोठ्या आनंदात साजरी करण्यात येत असते. अनेक गावात डिजे च्या तालावर,धिंगाणा घालत शिवजयंती साजरी केली जाते मात्र सिल्लोड तालुक्यात मादणी गावातील नवतरुणांनी या शिवजयंती पर्वावर संगीत शिवचरित्र कथेचे आयोजन करून एक वैचारिक पायंडा सुरू केला आहे. दि 16,17,18 फेब्रुवारी तीनदिवसीय कथेचे आयोजन करून परिसरातील शिवभक्तांना एक प्रकारची वैचारिक मेजवानीच दिली आहे. दि.16 रोजी शिव चरीत्र ग्रंथाची नगरप्रदक्षिणा होऊन रात्री ठीक आठ वाजता कथेला प्रांमभ होईल.शिवचरीत्रकथा प्रवक्ते शिवशंभू व्याख्याते श्री प्रदीप जगताप पाटील यांच्या सू-मधुर पहाडी आवाजात ही कथा श्रवण करायला मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.श्री जगताप यांच्या सह त्यांची टीम व अनेक कलाकरांच्या उपस्थित सजिव देखाव्याचे सुधा सादरीकरण होणार आहे.तीन दिवसीय संगीत शिवचरित्र कथेच्या आयोजनाने गावात व परिसरात आनंदाचे वातावरण आहे.शिवराजे मित्र मंडळ,छत्रपती धर्मवीर सभाजीराजे मित्रमंडळ,शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान,यांच्या वतीने एक आदर्श वैचारिक शिवजयंती साजरी करण्याचा निर्धार या वेळी गावकऱ्यांनी केला आहे.पंचक्रोशीतील जास्तीतजास्त शिवप्रेमी रयतेने संगीत शिवचरीत्र कथेचा अवश्य लाभ घाव्या असे आवाहन या वेळी आयोजकांच्या वतीने करण्यात आले.



====================

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# बस गाडया बंद झाल्यामुळे शि.आनंतपाळ तालुक्यातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण बंद



दैनिक युवक आधार - TIPL च्या वतीने PCL-2025 सिझन 3 चे क्रिकेटचे सामने रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा कोकण डायरी या मराठी वृत्तपत्राचे संपादक सय्यद अकबर यांचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूर अनंतपाळ** :तालुक्याची निर्माती होऊन २५ वर्ष उलटत आहेत पण या तालुक्यातुन केवळ दहा ते पाच गाड्याच फेरे मारतात . एकतर रस्ते खराब शेतकरी व कष्ठकरी मजूर गोर गरीब पाल्यांचे मुले मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी येत होते पण काही महिन्या पूर्वी सुरू केलेल्या बस गाडया अचानक बंद केल्या मुळे तालुक्यातील सर्वांत मोठे गाव असलेल्या येरोळ गावासह, साकोळ, थेरगाव, हिप्पळगाव , दैठणा, हालकी व चाकूर तालुक्यातील सुगाव येथील शेकडो मुले मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी शिरूरआनंतपाळ शहरात दररोज ये जा करतात पण उदगीर व लातूर आगाराकडून बस सोडण्याची मागणी येथील विद्यार्थी व विद्यार्थीनीने जिल्हा अधिकारी मॅडम ला संपर्क साधून विनंती केली आहे .तालुक्यातील येरोळ साकोळ थेरगाव हिप्पळगाव हे गावे लोक संख्येच्या दृष्ठीने मोठे आहेत . पण या गावातुन शेकडो विद्यार्थी दररोज शिरूर अनंतपाळ येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक , शासकीय औधोगीक प्रशिक्षण संस्थे बरोबरच बी ए, बी एस्सी ,बी कॉम सारखे महाविद्यालयीन शिक्षणा बरोबरच फार्मसी , नर्सिंग कॉलेजला शिकण्यासाठी शेकडो विद्यार्थी दररोज बसने ये, जा करीत होते . पण अचानक नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात उदगीर आगाराची सुरु असलेली बस गाडी अचानक बंद केल्यामुळे येरोळ , थेरगाव, हिप्पळगाव, सुगाव व साकोळ येथील विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे . त्यामुळे त्यांना त्यांच्या उच्च शिक्षणावर पाणी सोडण्याची वेळ आल्याची खंत विद्यार्थिनींने आपल्या भावना दै.लोकमत च्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केल्या .

**आम्हाला कोणी न्याय देईल का?**
महाविद्यालय व शाळा वाले म्हणतात की



आम्ही काय करू शकता आम्ही ही आनेक वेळा विभागीय नियंत्रक लातूर व आगर प्रमुख उदगीर व लातूर यांच्या कडे बस सुरू करण्यासाठी लेखी विनंती केली पण त्यांनी आमच्या अर्जाला विनंतीला दाद दिली नाही आमच्या विनंती पत्राला केराची टोपली दाखवली त्यामुळे आम्ही काही ही करू शकत नाही . तुम्ही तुमचे शिक्षण बंद करा असे आई-वडील म्हणतात . एकीकडे शासन मोफत शिक्षण देण्याच्या वल्गना करते . एकीकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याची सोयी आभावी शिक्षण बंद करावे लागत आहे .अशा दिवीदा मन अवस्थेमध्ये सापडलेल्या मुलींनी दै. लोकमत च्या प्रतिनिधीला भेटून त्यांच्या व्यथा सांगून विनंती केली . आम्हाला उच्च शिक्षण घ्यायच आहे , मोठे बनायचं आहे, अशी खंत थेरगाव , येरोळ, हिप्पळगाव येथील विधार्थीनीने आपल्या भावना व्यक्त केल्या व जिल्हाधिकारी मॅडमला फोन केल्या असता मॅडमच्या स्वय सायकाने तुम्ही मॅडमला मेसेज करा तुम्ही फोनवर बोलू नका असे त्यांच्याकडून उत्तर आल्यामुळे व्यतीत झालेल्या मुलीने नंतर लातूर येथील विभागीय नियंत्रकाला संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी मिटिंगमध्ये असल्याचे सांगितले अशा अनेक बाबीमुळे तालुक्यातून वेगवेगळ्या मार्गाने सुरु असलेल्या बस गाड्या बंद झाल्यामुळे तालुका परिसरातील शेकडो मुले मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत . हे केवळ बस गाड्या सुरू नसल्यामुळे तालुक्याला राजकीय दाता नसल्यामुळे तालुका विकासा पासून कोसो दूर आहे . दळण वळणाची जोपर्यंत सोय होत नाही तोपर्यत तालुक्याचा विकास होणार नाही . तालुका परिसरातील विद्यार्थीनी च्या मदतीला कोणता अधिकारी व लोक प्रति निधी धावून येईल का असे ही मुली बोलु लागल्या आहेत . जिल्हा अधिकारी मॅडम त्यांचा प्रश्न सोडवितील असे येथील मुलीने अशा बाळगल्या आहेत.



दैनिक युवक आधार - दिल्ली विधानसभा निवडणूक २०२५ मध्ये दिल्लीकरांनी भाजपला मोठी आघाडी मिळवून देत महाविजय साध्य केला आहे. हा सामान्य दिल्लीकरांच्या विश्वासाचा विजय आहे. हा गर्जनात्मक कौल साजरा करण्यासाठी तुळजापूर येथे भेट दिली व आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले. यावेळी सोबत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत विजयाचा जल्लोष साजरा केला. नागरिकांना पेढे भरवून अभिनंदन केले

# शासनाने ठरवून दिलेल्या दरात मिटर दुरूस्ती करा अन्यथा मिटर दुरूस्ती लायसन्स रद्द करा

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी** -शासनाने ठरवून दिलेल्या दरात मिटर दुरूस्ती करा अन्यथा मिटर दुरूस्ती लायसन्स रद्द करण्यात यावे महाराष्ट्र शासनाने १ फेब्रुवारी पासून ऑटोरिक्षा दरवाढ लागु केल्याने रिक्षा मिटरचे रिक्लेबेशन करून घेणे आवश्यक असल्याने शासनाने ठरवुन दिलेल्या दरात मिटर रिक्लेबेशन सुरू करावे तसेच रिक्षा चालकांची अडवणूक करुन जादा रक्कम घेणारे मिटर दुरूस्ती व्यावसायिकांचे लायसन्स रद्द करावे याबाबतचे निवेदन नवी मुंबई सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी मा. श्री गजानन.गावंडे साहेब यांना देण्यात आले. सदर प्रसंगी नवी मुंबई रिक्षा टॅक्सी संघटना संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष श्री. भरतजी नाईक, संस्थापक श्री. मारुती कोंडे , सरचिटणीस श्री. विजय पाटील, खजिनदार श्री. दिलीप आमले आपला माणूस आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते मा.परिवहन आयुक्त या बाबत लवकरच मिटींग घेऊन निर्णय घेतील व पुढील हप्त्यात रिक्लेबेशन सुरू करु तसेच नियमानुसार शासनाने ठरविलेल्या दरात मिटर दुरुस्ती न केल्यास सबंधीतावर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन अधिकार्यांनी दिले. रिक्षा चालकांनी रिक्लेबेशनचा



ठरविलेल्या दरातच काम करुन घ्यावे कुणीही जास्त रकमेची मागणी केल्यास आरटीओ अधिकारी किंवा रिक्षा संघटना पदाधिकार्यांकडे तक्रार करावी असे आवाहन नवी मुंबई रिक्षा टॅक्सी संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

======================

# निफाडला रमाई जयंति साजरी

**युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** - स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक मनोजभाई संसारे यांच्या संकल्पनेतुन निफाड येथिल निवृत्ती नगर मध्ये स्वारीप पक्षाच्या महीला आघाडीच्या वतिने त्यागमुर्ती रमाबाई जयंतिनिमित्ताने सुप्रसिद्ध व्याख्यात्या डॉ.प्रतिभाताई जाधव यांचे व्याख्यान संपन्न झाले.भिमाई-रमाई हे आमच्या स्वाभिमानी जगण्याचं गमक आहे .आमच्या स्वातंत्र्याचं कारण आहे .आमचं माणुस म्हणुन स्विकाराचं कारण आहे .तुमचा त्याग ,त्रास,व्यर्थ जाणार नाही कारण तुमची लेकरं आता विचार करताय,वाचताय लिहिताय व्यक्त होताय,व्यवस्थेला हादरा देताय.तुमचे वैचारिक आणि जैविक वारस लढलेय लढताय..तुम्ही आमच्या विचारात आहातच...त्यामुळेच उत्कर्ष आहे ..आणि ते सदैव असणार "असे विचार व्याखानातुन प्रतिभा जाधव यांनी सांगितले कार्यक्रमाचे

## रमाईचे विचार आत्मसात करावे डॉ.प्रतिभा जाधव




अध्यक्षस्थानी भंन्तेजी विनयप्रिय सुरत होते याप्रसंगी स्वारीप पक्षाचे शहरअध्यक्ष दादाराव काऊतकर, पंडीत दादाराव , सचिन खडताळे.सागर निकाळे ,साहेबराव भालेराव. हेमंत खडताळे. गौतम वानखेडे.राजु पाचपुंजे. निरज भालेराव.सर्जराव भिसे.मधु भालेराव.प्रकाश ठोके.बुधिस्ट भालेराव. श्रावण साळवे.नारायण भालेराव.विलास खडताळे .रमेश वाघमारे.धोंडीराम भालेराव.बाळु ठोके.दिलीप ठोके.रामनाथ बागले. विनोद गांगुर्डे .भाऊसाहेब भालेराव.नगरसेववीका अरुंधती पवार. मंगल साळवे. प्रीती मोरे.सुप्रिया वाटवे.सवीता काऊतकर.निशा साळवे.बहीणाबाई ठोके.निर्मला भिसे.लता वाटवे .सवीता सहजराव. माधुरी मोरे.अंजली धबाले.वैशाली शेजवळ.आदी भगीनी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# जिल्ह्यातील जलजीवन मिशन ची बंद असलेली कामे तात्काळ चालू करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा

## वसंत सुगावे पाटील यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर / नांदेड:** नांदेड जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून पाणीपुरवठा विभागाचे जलजीवन मिशनचे काम चालू होते पण शासनाकडे या कामांसाठी निधी नसल्यामुळे ही कामे कंत्राटदारानी बंद केली आहेत. त्यामुळे अनेक गावांत कामे अपूर्ण असून मा. जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून राज्य शासनाकडे पाठपुरावा करून या कामांविषयी प्रलंबित असलेल्या मागण्या ची पूर्तता करून कामे पूर्ववत चालू करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.सध्या उन्हाळा चालू झाला असून जिल्ह्यात अनेक गावांत पाणी प्रश्न मोठया प्रमाणावर भेडसावत असून अशात सदर कामे ही अर्धवट व अपूर्ण



आहेत याबाबत जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून शासनाकडे या कामांबाबत पाठपुरावा करून बंद असलेली कामे तात्काळ चालू करावी अशीही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.तसेच यावेळी नव्याने रुजू झालेले नांदेड चे नूतन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस च्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर कार्याध्यक्ष फेरोज पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस सहकार सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष बालाजीराव शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथालय सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष संतोष दगडगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल जिल्हाध्यक्ष रमेश गांजापूरकर,श्रीकांत मांजरमकर, राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल जिल्हा उपाध्यक्ष सत्तार अहेमद शेख,आनंद सूर्यवंशी, युवक उपाध्यक्ष शेख इरफान, उपस्थित पदाधिकारी होते.

# बहुचर्चित जमीन फसवणूक प्रकरणी नामदेव गोंधळी यांनी दिले तीनही आमदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**-बहुचर्चित जमीन फसवणूक प्रकरणी फसवणूक झालेले गरीब शेतकरी नामदेव गोंधळी यांनी पनवेल पंचायत समितीची सन 2024-25 च्या आमसभेत आ.प्रशांत ठाकूर, आ.महेश बालदी व आ.विक्रांत पाटील यांची भेट घेवून आपल्यावर झालेल्या अन्यायाचा त्यांनी पाढाच वाचला व तसे निवेदन सुद्धा दिले.तालुक्यातील वावंजे येथे राहणारे फसवणूक झालेले शेतकरी नामदेव गोंधळी यांनी घेतलेल्या 12 व्या पत्रकार परिषदेत त्यांनी त्यांची जमीन वसई-विरार, पनवेल-अलिबाग या बहुउद्देशीय मार्गिकेत संपादीत होणारी महामार्गाच्या एका कडेची मौजे : वावंजे सर्व्हे नं.123/2 एकूण क्षेत्र 0-38-70 जमिनीपैकी क्षेत्र 0-19-35 हे.आर. ही प्रतिवादी नं.1 विक्रांत गिरीश संसारे यांना



दि.24/08/2020 रोजी विक्री केली होती. परंतु सदर जमिनीचा अगोदरचा मालक जमीन कायमस्वरुपी विक्री घेणारा याने तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय यांच्या मार्फत त्यांचे चुलते परशुराम गोंधळी यांची उत्तरेकडील जमीन दि.24/12/2021 रोजी विक्रांत गिरीश संसारे यांच्या नावावर केली आहे. त्या दरम्यान मी आजारी होतो व या माध्यमातून माझे मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली आहे. याबाबत मी शासकीय सर्व दरबारी अर्ज फाटे केले असूनही मला अजूनही न्याय मिळत नाही तरी माझ्या झालेल्या फसवणुकीबाबत महाराष्ट्र शासनाकडे या आमदारांनी पाठपुरावा करून मला न्याय द्यावा ही मागणी केली आहे व मागणीला त्यांनी सुद्धा सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याने लवकरच मला शासनाकडून न्याय मिळेल असा विश्वास सुद्धा गोंधळी यांनी व्यक्त केला आहे.

================

## वास्तवाचे चटके

वास्तवाचे मी चटके सोसतो
खचत नाही कधीच क्षणभर
जिद्द जगण्याची उरी बांधली
असोत संकटे समोर मणभर

सावलीने जरी साथ सोडली
तमा नसे मज आता कशाची
पर्वा नको या मतलबी जगाची
स्वप्ने जाळती माझिया उशाची

कारणे झाकली अन् कर्म दिसले
मिथ्या बहाणे वेशीवर ते सोडले
यश प्राप्तीचा मार्ग जरी खडतर
सहयात्री मी जरा जिद्दीच जोडले

नाही,नकोचा पाढा विसरुनी
ध्यानी ,मनी केवळ हा ध्यास
तो असला, हा तसला सोडून
करूया आज स्वतःचा अभ्यास

चला आज नव्याने पुन्हा रचुया
आपणच आपला सुवर्ण इतिहास
“पवन” वास्तव जरी कठीण असले
आपल्या मेहनतीवर ठेव तू विश्वास

पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड

# रेवदंडा हायस्कूलच्या बस स्टॉपची दुरावस्था

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**-रेवदंडा गाव हे मिनी गोवा म्हणून ओळखले जाते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक रेवदंडा गाव फिरण्यासाठी येतं असतात काही पर्यटक मुंबई ,पुणे, ठाणे, धुळे शिर्डी , कोल्हापूर, साताराअशा विवीध ठिकाणाहून येतं असतात मिडल क्लास लोकं एस टी ने प्रवास करतात काही लोकं रेवदंडा हायस्कूल जवळ उतरतात रेवदंडा बीच साइडला भरपुर राहण्याची उत्तम सोय आहे पण रेवदंडा हायस्कूल जवळ उतरल्यावर हायस्कूलच्याबस स्टॉप ची बिकट झालेली दुरावस्था बघितल्यावर पर्यटकांना रेवदंडा गावची कीव व दया येते एवढा गरीब गाव आहे साध बस स्टॉप पण कलर काम करू शकत नाही एवढे रेवदंडा ग्रामपंचायत ची परिस्थिती गरीब आहे की साधा कलर काम पण करू शकत नाही असे पर्यटकांमध्ये ,ग्रामस्थांमध्ये जोरदार चर्चा होत आहे. गावातील काही समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते स्वतःच्या खर्चाने साफ सफाई करुन, कलर काम करण्यास तयार होते पण रेवदंडा गावातील काही लोकांनी आपली मनमानी करत आम्हीच करू असे सांगीतले पण आजतागायत कोणीही कामं केलं नाही आणि कोणालाही करू देत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली तस पाहता महायुती सरकार मधील अर्ध मंत्रिमंडळ मंत्री,आमदार सारखे रेवदंडा येथे येतं असतात त्यांचं श्रद्धास्थान आहे पण एका पण राजकीय पुढाऱ्यांना वाटत नाही रेवदंडा हायस्कूल बस स्टॉप हा अत्यंत महत्त्वाचा बस स्टॉप आहे शाळेतील विद्यार्थी, प्रवासी, पर्यटक बहुतेक ह्याच बस स्टॉप चा वापर करतात उन्हाळी, पावसाळी, हिवाळी पण त्याची एवढी दयनीय अवस्था , तीन तीन फूट गवत वाढलेलं त्यातना विषारी जीवजंतू फिरत असतात व विमल गुटख्याची दुर्गंधी पसरली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं बहुतेक या गावात येणं जाणं असतं रेवदंडा ग्रामपंचायत ही शिंदे गटाची म्हणून ओळखली जाते आणि ही परिस्थिती अशी ग्रामस्थां मध्ये जोरदार चर्चा होत आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतः लक्ष घालून या बस स्टॉपची दुरुस्ती करण्यास सांगावी अशी जनतेमध्ये जोरदार मागणी जोर धरू लागली आहे



# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत मॉर्डन मोटर ड्रायव्हिंग स्कूलच्या वतीने 100 दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेट वाटप,



**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**-रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत मॉर्डन मोटर ड्रायव्हिंग स्कूल मोदीखाना पुणे कॅम्प, मोटार ड्रायव्हिंग स्कूल ओनर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य, प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे व वाहतूक शाखा पुणे लष्कर यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्प येथील बाटा चौक येथे 50 दुचाकीस्वारांना व 50 पुरुष दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेट वाटप प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणेचे मोटर वाहन निरीक्षक जयवंत पोळ व पुणे मोटर वाहन निरीक्षक राणी वर्पे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मोटर ड्रायव्हिंग स्कूल ओनर असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष राजू घाटोळे मॉर्डन मोटर ड्रायव्हिंग स्कूल पुणे कॅम्प संचालक अब्दुल्ला काझी, महादेव देसाई पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर गायकवाड, हवालदार संगीता जाधव, किरण राऊत, प्रियंका बनकर, मंगला पवार, आकाश गायकवाड, तन्वीर शेख, शरद मुळीक आदि यावेळी उपस्थित होते,या कार्यक्रमाचे आयोजन मॉर्डन मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक अब्दुल्ला काझी यांनी केले होते

# कुटुंबिनी महिला संघ उरण चा हळदिकुंकू समारंभ धुमधडाक्यात साजरा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**–शनिवार दिनांक ८ जानेवारी रोजी कुटुंबिनी महिला संघ उरण चा हळदिकुंकू समारंभ महाराष्ट्र भुषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी शाळेत मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा झाला.कुटुंबिनी नावातच मायेचा ओलावा, बंध आपुलकीचे असल्याने उरणमधील समस्त महिलांसाठी हि एक आनंदाची, आपली कला दाखविण्याची संधीच उपलब्ध करून दिली आहे या कार्यक्रमातून. अशा या बहारदार कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या लावणी सम्राज्ञी मेघा घाटगे, भाजप च्या निताताई बालदी, राष्ट्रवादी काँग्रेस च्या भावना घाणेकर, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, भाजपच्या शैलजा ताई घरत, प्रतिक्षा डायस जी एम पटेल ज्वेलर्स,आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करुन गणेशाची पुजा करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले पाहुण्यांच्या स्वागता नंतर कुटुंबिनी महिला संघ उरण च्या संस्थापिका आरती ढोले व अध्यक्षा श्लोक पाटील यांनी प्रास्ताविक वाचले त्यानंतर मान्यवरांनी आपल्या भाषणातून महिलांना प्रोत्साहित केले. कुटुंबिनी महिला संघ उरण च्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाच महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रिती पाटील (स्केटिंग प्रशिक्षक,)मानसी सिंग ( मेकअप आर्टिस्ट,)रणिता ठाकूर (पत्रकार), कल्पना सुर्वे (सामाजिक कार्य) पल्लवी शिंदे (इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट) म्हणून गौरविण्यात आले. या कार्यक्रमामध्ये ज्युनिअर सलमान खान (जोहेब सय्यद) ची एन्ट्रीने खूप रंगत आणली तसेच लावणी सम्राज्ञी मेघा घाडगे यांनी आपल्या दिलखेचक अदांनी लावणीच्या नृत्याने घायाळ केले. त्याचप्रमाणे महिला कलाकारांना या हळदीकुंकू समारंभ कार्यक्रमाच्या निमित्ताने आपली कला दाखविण्याचे व्यासपिठ मिळाले. एक से बढकर एक असे नृत्य ,गाणी, एकपात्री अभिनय फॅशन शो अशा कार्यक्रमांनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली. हळदीकुंकू म्हणून पटूल ज्वेलर्स कडून महिलांना एक सौभाग्य अलंकार वाण म्हणून देण्यात आले. तसेच लकी कुपन द्वारे विजेत्या दोन महिलांना पटेल ज्वेलर्स कडून मानाची पैठणी देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या हरहुन्नरी शैलीने दर्शना माळी यांनी केले. तर निशा म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वी व सुनियोजित होण्यासाठी कुटुंबिनी महिला संघाच्या आरती ढोले (संस्थापिका ) श्लोक पाटील,(अध्यक्षा ) दिपिका माळी,(कार्याध्यक्षा )नयना धोत्रे (उपाध्यक्षा), वृषाली पवार (सचिव), प्रियांका घरत (सहसचिव) शुभांगी शिंदे (सहसचिव ),निशा म्हात्रे (खजिनदार )गायत्री माळी (सह खजिनदार), प्रिया मयेकर (जनसंपर्क ),दर्शना गावंड (जनसंपर्क), कल्पना सुर्वे (जनसंपर्क), रिद्धी पाटील (सल्लागार), संगीता साळुंखे (सल्लागार), सविता डेरे (सल्लागार) ,रश्मी गावंड (सदस्या), सुप्रिया राक्षीकर ( सदस्या ),प्रशाली सावंत( सदस्या ),मानसी सिंग (सदस्या ),ऋतुजा बंसल( सदस्या ),साची साहतीया (सदस्या) आदीं चे योगदान महत्त्वपूर्ण आहे.



# वाकद गाव तहानलेले ? पाणीपुरवठ्याचे काम पूर्ण कधी होणार "?

## 'सध्या स्थितीत गावकऱ्यांना' पाणीपुरवठा करणे गरजेचे !' ' त्रस्त ग्रामपंचायत सदस्याचा एल्गार'

**दैनिक युवक आधार**

**रिसोड वार्ताहर/रणजीत सिंह ठाकुर-** दि.०७/०२/२०२५ रोजी रिसोड गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले.रिसोड तालुक्यातील वाकद हे गाव नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. या गावाचा पाण्याचा प्रश्न अद्यापही सुटला नसून जल जीवन मिशन अंतर्गत पाईपलाईनचे काम चालू असून जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाल्याचे ग्रामपंचायत सदस्यांनी केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या बाबीला काम चालू होऊन आज तीन वर्षे लोटली पण काम पूर्ण झाली नाही. या कामामुळे गावातील पाणीपुरवठ्याची जी पाईपलाईन होती ती पूर्णतः उध्वस्त झाल्याने संपूर्ण पाणीपुरवठा बंद आहे. जुन्या वाकद गावालगत दोन विहिरी असून निदान त्या विहिरीहून तरी गावाला सध्या स्थिती त पडत असलेला तुटवडा पूर्ण करावा व वाकद गावकऱ्यांची तहान भागवावी. अशी निवेदनाद्वारे वाकद ग्रामपंचायत सदस्यांनी गटविकास अधिकारी रिसोड यांच्याकडे केली आहे. या निवेदनाद्वारे असे लक्षात येते की प्रत्येक विभाग आपापल्या परीने टोलवा टोलवीची उत्तरे देत असून गावकरी मात्र पाणी मिळण्यापासून वंचित आहेत. याबाबत अनेक आंदोलने सुद्धा झाली. प्रत्येक वेळी समाधान करण्याचा प्रयत्न झाला पण जलजीवन मिशनचे काम आज पर्यंत



पूर्ण न झाल्याने गावकऱ्यांना परत त्याच मार्गाने जावे लागेल का ? असा यक्षप्रश्न गावकऱ्यासमोर निर्माण झाला असल्याने याबाबतची कैफियत रिसोड चे गटविकास अधिकारी यांना प्रत्यक्ष भेट घेऊन दिली आहे. त्यामध्ये शेख बिलाल शेख कुरेशी माजी उपसरपंच तसा कार्यरत ग्रामपंचायत सदस्य, गणेश नारायण मोरे सदस्य, वर्षाताई गजानन तिरके सदस्या, गंगाबाई सुरेश चोपडे सदस्या, छायाताई मनोज कंकाळ सदस्या, सय्यद अकील सय्यद हुसेन सदस्य या सर्वांनी पंचायत समितीमध्ये येऊन गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेऊन मिशनचे राहिलेले पूर्ण काम करावे व सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या जुन्या दोन विहिरीमध्ये पाणी आहे व त्यावरून गावासाठी पाणीपुरवठा करावा व तो करण्यासाठी संबंधित यंत्रणेला आदेशित करावे अशी मागणी केली. जर पाणीपुरवठा लवकरात लवकर चालू केला नाही तर पूर्वीप्रमाणेच रास्ता रोको त्याला ठोको, किंवा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याची वेळ येऊ नये व जर आल्यास सर्व जबाबदारी प्रशासनाची असेल असे यावेळी बोलतांना सांगितले व तसेच निवेदनातही नमूद आहे.

# आज कळंबोलीत कुस्त्यांचा आखाडा

## रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध रुस्तम ए हिंद लाली गुरुदास पोल यांचा आकर्षक सामना

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**-भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे पनवेल विधानसभा मतदार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ अंतर्गत रविवार दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ०४ वाजता कळंबोली मधील सेक्टर १६ येथे भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख (सोलापूर) विरुद्ध रुस्तम ए हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) यांचा खास आकर्षण सामना होणार असून यामधील विजेत्या पैलवानास पाच लाख रुपये व मानाची गदा, तर महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. अमेधा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना होणार आहे. यातील विजेत्या पैलवानाला ५१ हजार रुपये व मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.तसेच पुरुषांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. निखिल कदम विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अनिल कचरे, पै. शुभम वळखडे विरुद्ध पै. आकाश दुबे, पै. श्रेयश कचरे विरुद्ध पै. सुशांत देवमाने, पै. साजन पावशे विरुद्ध पै. निलेश कदम, आणि पै. समाधान घनपट विरुद्ध विजय घुले यांच्या सामना रंगणार आहे. महिला गटात पै. स्नेहा येवले विरुद्ध वैष्णवी यादव आणि पै. रितिका कारंडे विरुद्ध गौरी जाधव यांचा

### विजेत्याला पाच लाख रुपये व मानाची गदा; विविध गटात होणार सामने

विशेष सामना होणार आहे. कुस्ती स्पर्धेतील महिला ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रत्येकी विजेतीला १ हजार रुपये तर उपविजेतीस ५०० रुपये, ५० किलो खालील गटातील विजेतीला १५०० रुपये व तर उपविजेतीस १ हजार रुपये, ५५ किलो वजनाखालील गटातील विजेतीला २ हजार रुपये तर उपविजेतीस १५०० रुपये आणि ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटातील विजेतीस १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा तर द्वितीय क्रमांकाला ५ हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये, १७ वर्षाखालील मुले गटातील ३०, ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपये तर द्वितीय क्रमांकाला ५०० रुपये, ५० व ५५ किलो खालील गटातील प्रथम क्रमांकाला प्रत्येकी १५०० रुपये द्वितीय क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपये, ६०, ६५ आणि ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास अनुक्रमे २ हजार रुपये, ३ हजार रुपये आणि ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास अनुक्रमे १५००, २ हजार आणि ३ हजार रुपये, वरिष्ठ मुले ५० ते ६० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास २ हजार रुपये, ६० ते ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये, ७० ते ७९ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये, तसेच ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकास ५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये असे कुस्ती स्पर्धेत एकूण ८ लाख ५१ हजार रुपयांच्या बक्षिसांचे स्वरूप आहे. मानाच्या अशा या कुस्ती दंगलीचा कुस्तीप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धेचे संयोजक कळंबोली भाजपा व पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासोडी येथे सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे-**जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालूक्यातील पासोडी येथे दि , रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शाळेमध्ये मुलांनी अप्रतिम कार्यक्रम सादर केल्याचे प्रतिपादान जाफराबाद प.स.चे विस्तार अधिकारी मा.श्री काळे साहेब यांनी केले. जि.प.शाळा पासोडी येथे आयोजित एक सांज बालगोपाळांची कार्यक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारज बु.केंद्राचे केंद्र प्रमुख मा.श्री चिंचोले सर,केंद्र शाळा भारज बु.चे प्र. मुख्याध्यापक श्री उखळकर सर,पासोडी ग्रामपंचायत चे सरपंच श्री चंदनसिंग ताटू, उपसरपंच सौ वर्षाताई धनावत,तसेच इतरही सर्व सदस्य,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री भगतसिंग लोदवाळ, उपाध्यक्ष सौ नरवाडे मॅडम,व इतरही सर्व सदस्य



उपस्थित होते या कार्यक्रमात मुलांनी विविध हिंदी मराठी चित्रपट गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थित ग्रामस्थांची मने जिंकली.सदर सांस्कृतीक कार्यक्रमाची सुरुवात सांय ७.०० वा सुरू झाली. कार्यक्रमाचा प्रारंभ ॐ गणेशाय प्रार्थना या सामुहीक नृत्याने झाला, या सुंदर प्रार्थनेने सर्वांची मने जिंकली, नंतर अंबाबाई गितावर सामुहीक नृत्य सादर झाले, या नृत्याने तर कार्यक्रमास बहार आणली, एक ताल, सुर, लय, सुरेख असे महाराष्ट्रीय ड्रेसिंग या नृत्याला बक्षिसाची उधळण झाली, इतक्या या सुंदर नृत्यास प्रेक्षकांनी वन्समोअर केले. समोर भरगच्च तुंडूब गर्दी तरी चिमुकले न घाबरता न उमगता सुंदर अशी कला सादर करीत होते. यानंतर छोट्या चिमुकल्यांनी आपल्या शेतकरी राजावर सुंदर अशा शेतकरी वेशभुषेत गित सादर केले, या गितावर तर बाहेर प्रेक्षक सुद्धा टाळ्या वाजवून थिरकायला लागले, सर्व शालेय मैदान अपूरे पडले एवढी प्रचंड साद ग्रामस्थांनी आपल्या चिमुकल्यांचे कौतुक पाहण्यासाठी गर्दी केली. देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या तसेच पोलिस खात्यात लागलेल्या मुलांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.यातच या छोट्यासा ग्राम मधून सर्वांना भूषणावह अशी राज्यसेवा मधून पी. एस. आय. पदी निवड झालेल्या कुमारी मोहिनी दामोधर खंदाडे हिचा सर्वांच्या उपस्थित सत्कार करण्यात आला. सदर शाळेचे मुख्याध्यापक श्री धनावत सर तसेच श्री जायले सर,श्री गाढे सर,श्री मुजमुले सर,श्री पडघान सर व श्री येळवंडे सर या शिक्षकवृदांनी खुप मेहनत घेऊन, छान नियोजन केल्यामुळेच रात्रीचे आयोजीत सांस्कृतीक कार्यक्रम यस्ववी केलेत, या सहशालेय उपक्रमातून शाळेचे एक सुंदर रूप समाजामध्ये प्रगट करण्यात यशस्वी झाले.

# ग्राहक कल्याण परिषद, माहिती अधिकार संरक्षण समिती व राज्य परिवहन महामंडळ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रवासी दीन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर ज्योत्स्ना करवाडे.-**भारतीय संस्कृतीत रथ सप्तमी ला अनन्य साधारण महत्त्व आहे आणि याच दिवशी सूर्याचा प्रवासही चालू होतो. दिवस मोठा मोठा होत जातो त्या अनुषगाने अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद व माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती व नागरी विकास मंच व राज्य परिवहन महामंडळ नागपूर यांच्या वतीने4 फेब्रुवारी या प्रवासी दिनाच्या कार्यक्रम 5 फेब्रुवारी 2025 रोजी राज्य परिवहन महामंडळ गणेश पेठ नागपूर येथे आयोजित करण्यात आला त्यावेळी उपस्थित पाहुणे मंडळी नागरी विकास मंचाचे अध्यक्ष ग्राहक संरक्षण समितीचे विदर्भ अध्यक्ष मिलिंद खेकाळे सर व माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समितीच्या अमरावती महिला जिल्हाध्यक्ष सौ जोशना करवाडे व राज्य परिवहन महामंडळ नागपूर चे व्यवस्थापक श्री अभय बोबडे , नागरी विकास मंचाचे श्री यशवंत जी खरे आधी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमां अंतर्गत ज्यांनी अविरत 30 वर्षे सेवा वाहक व चालक म्हणून दिल्या आणि एकही एक्सीडेंट केला नाही प्रत्येक प्रवासाची नीट काळजी घेतली अशा तीन व्यक्ती म्हणजे श्री ठाकरे सर नागपूर सरआणि नांदने मॅडम यांना शाल श्रीफळ प्रमाणपत्र आणि स्मृती चित्र व बुके देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमामध्ये मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले खेकाले यांनी सन्मान पत्राचे वाचन केलें तर अभयजी बोबडे यांनी आमच्या कर्मचाऱ्यांकडून कुठलही प्रवाश्यांना त्रास होणार नाही याची ग्वाही दिली यशवंत जी खरे यांनी वाहक व चालक यांच्यावर कशी आपण सर्व प्रवाशांची काळजी घेतात हे सांगितले तर ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांनी आरटीओ यांनी जे रस्त्याचे नियम आखून दिले आणि ते जनतेने सुद्धा कसे पाळले पाहिजे की ज्यामुळे वाहक आणि चालक यांना गाडी चालवताना त्रास होणार नाही याबाबत प्रकाश टाकला.शेवटी आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली



# अखेर ७ महिन्यानंतर जिल्हा रुग्णालयाच्या सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागणीची जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरातांकडुन दखल :- डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची देखभाल व स्वच्छता करण्यासाठी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी नकार दिला होता. प्रशासन देखील हे काम कर्मचाऱ्यांना करायला लावण्यास धजावत नव्हते त्या मुळे मागील ७ महिन्यांपासून स्वच्छतागृह कुलुप बंद होते. परीणामी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आंतररूग्ण विभागात दाखल रूग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक तसेच सोनोग्राफी करण्यासाठी ताटकळत असलेल्या गर्भवती

**स्वच्छतागृह सुरू करण्यात आले असून लवकरच नविन माता व बाल रुग्णालयातील स्वच्छतागृहे वापरात येतील :- जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात**

महिला असा दररोज हजारो लोकांचा रूग्णालयात राबता असतो. मात्र जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे ? असा प्रश्न पडला होता त्या मुळे शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत होती. त्या मुळे नागरीकांची गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने सार्वजनिक स्वच्छतागृहे खुले करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, सुदाम तांदळे,




मुबीन शेख, शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना लेखी निवेदनाद्वारे केली होती. अखेर याची दखल घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या आदेशाने जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले असुन येथीलच कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे काम देण्यात आले आहे. या मुळे नागरीकांची विशेषतः महिलांची होणारी हेळसांड थांबली आहे.

**जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृह सुरू करण्यात आले आहे.आता माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नव्याने बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह बांधण्यात आलेले आहे. लवकरच त्याचा ही वापर सुरू करण्यात येईल असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी सांगितले.**

# परतूर येथे त्यागमूर्ती माता रमाईची जयंती उत्साहात केली साजरी...

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)**–परतूर येथे बहुजनांची आई त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती प्रचंड उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. जयंती निमित्त ठीक सकाळी ठीक १० वाजता तहसील कार्यालयाच्या समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेवर वंचित बहुजन आघाडीचे नेते रामप्रसाद थोरात व सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.त्या नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.नंतर जयंती समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला, त्यानंतर बोधाचार्य हेमंत पहाडे यांनी उपस्थित बौद्ध उपासक उपासिका व आंबेडकरी अनुयायांना बुद्ध वंदना देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली, नंतर उपस्थित मान्यवरांचे जनसमुदायाला मार्गदर्शन मिळाले, या वेळी प्रमुख अतिथी म्हणून शहाजी राक्षे, शिवाजी पाईकराव, रमेश पाईकराव, अँड.महेंद्रकुमार वेडेकर, इब्रान भाई कुरेशी, ढवळे साहेब, सिद्धार्थ बंड उपस्थित होते.यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रशांत वाकळे, सचिव स्वप्निल पहाडे,प्रदीप साळवे, प्रभाकर प्रधान, सनी गायकवाड, दीपक हिवाळे,पत्रकार राज भदर्गे, अविनाश पाडेवार, राहुल पहाडे, यांनी अतिशय चांगल्या प्रकारे कार्यक्रमाचे नियोजन केले होते. सूत्रसंचालन वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष राहुल नाटकर यांनी केले



होते. संध्याकाळी ठीक सहा वाजता माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या भव्य मिरवणुकीची सुरूवात रेल्वे स्टेशन येथील संविधान चौकातून पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे, पोलिस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, वंचितचे नेते रामप्रसाद थोरात, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार, युवा नेते नितीन जेथलिया, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष रवींद्र भदर्गे,शहाजी राक्षे व शिवाजी पाईकराव यांच्या हस्ते माता रमाईच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. सजलेल्या रथामध्ये माता रमाईची प्रतिमा ठेवण्यात आली होती. ढोल-ताशांच्या गजरात सजवलेल्या आकर्षक अशा रथातून माता रामाईची मिरवणूक निघाली होती. परतूर येथे माता रमाई जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत मोठ्या संख्येने समाजबांधव, आंबेडकर प्रेमी सहभागी झाले होते,या मध्ये महिलांची संख्या प्रचंड प्रमाणात होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषनेने संपूर्ण परतूर शहर दणाणून गेले होते. मिरवणुकीचा समारोप आंबेडकर नगरमध्ये रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. मिरवणुक शांततेत पार पाडण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रशांत वाकळे, सचिव स्वप्निल पहाडे, राहुल नाटकर, प्रदीप साळवे, सनी गायकवाड, मारी साळवे,विलास पाडेवार, दीपक भदर्ग, राहुल पहाडे,कुमार लांडगे, धम्मपाल खंडागळे, गुलाब दंवडे, अजय पाडेवार, विशाल पाडेवार, महेंद्र पाडेवार, भीमा जाधव, तुषार पहाडे, प्रकाश पाडेवार, लखण पहाडे, सचिन सोनपसारे , रुपेश पहाडे आदींनी परिश्रम घेतले. मिरवणुकीचा समारोप आंबेडकर नगर येथे करण्यात आला. या वेळी पोलिस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे, उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, मुंढे साहेब, विजय जाधव, पवार साहेब, खाडे साहेब, शिंदे साहेब व इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.